अर्धसाप्ताहिक
# ब्रम्हपुरी समाचार
संपादक
अशोक भैया
RNI No. MAHMUL/2016/69789
E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com
Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25
गुरूवार, दि. 09 ऑक्टोबर 2025 | वर्ष 11 वे | अंक 08 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# ब्रम्हपुरी नगराध्यक्ष पद ओबीसी प्रवर्गाकरीता राखीव

## खुला प्रवर्ग ११, ओबीसी ०६, अनु.जाती ०५, अनु. जमाती ०१

### प्रभागनिहाय आरक्षण जाहीर




ब्रम्हपुरी/का.प्र.

राजकीय पक्षांना व जनतेला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वेध लागले होते. अनेक नगरपालिका, नगर परिषदा, नगरपंचायतींच्या निवडणुका रखडल्या होत्या. अनेक पालिकांचं कामकाज हे प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे सोपवण्यात आलं होत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होणार हा प्रश्न सातत्याने उपस्थित केला जात होता. अशातच जानेवारी २०२६ पूर्वी या निवडणुका घ्या, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला दिले.

दरम्यान, या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ब्रम्हपुरी नगरपरिषद नगराध्यक्ष पदाच्या आरक्षणाची सोडत जाहीर करण्यात आली. ब्रम्हपुरीचे नगराध्यक्ष पद ओबीसी प्रवर्गाकरीता आरक्षित करण्यात आले आहे. तसेच जिल्हाधिकारी चंद्रपूर यांच्या आदेशाप्रमाणे ब्रम्हपुरी नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ चे प्रभाग निहाय आरक्षणाची सोडत ०८ ऑक्टोंबरला दुपारी १२ वाजता काढण्यात आली. यामध्ये एकुण ११ प्रभागाकरीता २३ नगरसेवक निवडूण द्यायचे आहेत. तर नगराध्यक्ष हा जनतेतून निवडून द्यावयाचा आहे.

ब्रम्हपुरी नगर परिषदेकरीता एकुण २३ नगरसेवकांपैकी १२ पदे महिलांकरीता आरक्षित आहेत. **सर्वसाधारण गट -** सर्वसाधारण ०६ व महिला ०५ असे एकुण ११, **नामप्र(ओबीसी) प्रवर्गातून -** सर्वसाधारण ०३ व महिला ०३ एकुण ०६, **अनुसुचित जाती प्रवर्गातून-** सर्वसाधारण ०२ व महिला ०३ एकुण ०५ तसेच अनुसूचित जमाती मधून ०१ महिला असे एकुण २३ नगरसेवकांना निवडून द्यावयाचे आहे.

**प्रभागनिहाय आरक्षण खालील प्रमाणे घोषित करण्यात आले आहे.**

**प्रभाग क्रमांक ०१-** ना.म.प्र. (महिला), सर्वसाधारण, **प्रभाग क्रमांक ०२ -** अनु. जमाती (महिला), सर्वसाधारण, **प्रभाग**

(उर्वरित पान क्र. ६ वर)

# ने.हि. महाविद्यालयाची उज्ज्वल यशाची परंपरा अबाधित

## गोंडवाना विद्यापीठाच्या मेरिट यादीमध्ये महाविद्यालयातील २६ विद्यार्थ्यांचा समावेश



ब्रह्मपुरी/का.प्र.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आपल्या उज्ज्वल यशाची परंपरा राखीत गोंडवाना विद्यापीठाने सत्र २०२४-२५ या शैक्षणिक सत्रातील घोषित केलेल्या गुणवत्ता यादीत नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयातील २६ विद्यार्थ्यांनी आपले यशाचे शिखर पादाक्रांत करीत नाव कोरले आहे.

यात अंबिका मांढरे (बी.ए.८ वे मेरिट), किरण नाकतोडे (बी.ए. भूगोलमध्ये प्रथम मेरिट), वैष्णवी थेरकर (बी. कॉम प्रथम मेरिट), दीपा बोरकुटे(बी.कॉम तिसरे मेरिट), गौरव भोयर (बी.कॉम चवथे मेरिट), रोहित गोंगल (बी.कॉम ५ वे मेरिट), सोनी शेंडे ( एम.ए इंग्लिश ३ रे मेरिट), साईनाथ मस्के (एम.ए इंग्लिश ५ वे मेरिट), फरनाज पठाण ( एम.ए मराठी प्रथम मेरिट), स्नेहा बनपुरकर (एम.ए मराठी २ रे मेरिट), पियूष बहेकर (एम.ए मराठी ३ रे मेरिट), आर्शिया शेख ( एम.ए समाजशास्त्र प्रथम मेरिट), कृष्णा दास ( एम ए भूगोल प्रथम मेरिट), डेव्हिड राऊत ( एम.ए भूगोल २रे मेरिट), आचल मेश्राम (एम.ए भूगोल ३रे मेरिट), अश्विनी कुरेकर ( एम.ए इतिहास ५वे मेरिट), निकेश कुळे (एम.ए राज्यशास्त्र ३ रे मेरिट), सुशांत मेश्राम ( एम.कॉम ३ रे मेरिट), अनम धमाणी ( एम एस स्सी कम्प्युटर प्रथम मेरिट), शितल रामटेके ( एम एस स्सी बॉटनी २रे

(उर्वरित पान क्र. ६ वर)



## संपादकीय...

# जीवघेणी औषधे

कधी कधी 'आजार परवडला, पण उपचार नको' अशी परिस्थिती उद्भवते. ज्या औषधांमुळे विकार बरे व्हायला हवेत त्या औषधांनी प्राणच हिरावून घेतले तर कसे व्हायचे? भारत हा जेनेरिक औषधांचा सर्वात मोठा पुरवठादार आहे आणि जगातील औषध निर्यातीत भारताचा वाटा २० टक्के आहे. औषध निर्मितीत भारत जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे. संयुक्त राष्ट्र ही भारतातील औषध निर्यातीसाठी सर्वात मोठी बाजारपेठ आहे. कारण एकूण फार्मा निर्यातीचा एक तृतीयांश भाग अमेरिकेला जातो. अमेरिकेव्यतिरिक्त, युरोपियन संघ, दक्षिण आफ्रिका, ब्रिटन आणि ब्राझील यांसारख्या बाजारपेठांमध्येही भारतीय औषधांची निर्यात केली जाते. सुमारे दोनशे देशांत इथून औषधे निर्यात होतात, ही बाब भूषणावह असली तरी अधूनमधून अशा घटना घडतात की भारतीय औषधांच्या दर्जावर भलेमोठे प्रश्नचिन्ह लागते. अशा घटना वारंवार घडल्यास ज्या औषध कंपन्या गुणवत्तापूर्ण औषधे तयार करतात त्यांनाही फटका सहन करावा लागतो.

मध्य प्रदेशच्या छिंदवाडामध्ये विषारी कफ सीरप प्यायल्याने चौदा मुलांचा झालेला मृत्यू ही ताजी घटना अतिशय लाजिरवाणी आहे. मध्य प्रदेशच्या बेतूल जिल्ह्यातही अशाच प्रकारे दोन मुलांचे बळी गेल्याचे आढळले आहे. या प्रकरणी मध्य प्रदेशातील एका डॉक्टरला अटक करण्यात आल्याने ज्याने जीव वाचवायचे तोच प्राण हिरावून घेत असल्याचे उघड झाले आहे. विशेष म्हणजे हा सरकारी डॉक्टर असतानाही खासगी क्लिनिक चालवत होता. त्यामुळे सरकारी यंत्रणा कशी बेपर्वाईने काम करते हे या आणखी एका घटनेमुळे निदर्शनास आले आहे. या प्रश्नामुळे, अनेक राज्यांनी या कफ सिरपवर बंदी घातली आहे आणि केंद्र सरकारने दोन वर्षांखालील मुलांना ते घेण्यापासून रोखण्यासाठी समन्स पाठवले आहे. या औषधांची सुरक्षितता निश्चित करण्याचे काम ज्या यंत्रणेचे आहे ती सदोष आहे. आरोग्यासोबत खेळखंडोबा होतो, हे सरकारी यंत्रणेचे अपयश आहे. याचे एक प्रमुख कारण म्हणजे सरकारी यंत्रणेत पसरलेला भ्रष्टाचार. औषधनिर्मिती क्षेत्रात आरोग्याशी संबंधित ज्या प्रमाणात निगराणी आणि खबरदारी घेण्याची गरज आहे त्या प्रमाणात ती घेतली जात नाही हेच या घटनेतून दिसून आले आहे. तमिळनाडूच्या औषध कंपनीने तयार केलेल्या या कोल्ड्रिफ कफ सिरपच्या नमुन्यात ४८.६ टक्के डाईएथिलीन ग्लायकॉल आढळले आहे. आंतरराष्ट्रीय मानकानुसार याचे प्रमाण ०.१० टक्क्यांपेक्षा अधिक असता कामा नये. हे एक असे धोकादायक औद्योगिक रसायन आहे ज्याचा वापर वाहने आणि यंत्रांमध्ये होतो. याच रसायनामुळे पीडित मुलांच्या किडण्या निकामी झाल्या. ही घटना उघडकीस आल्यापासून कारवाईचे सत्र सुरू झाले असून हे औषध मागे घेण्यात आले आहे.

भारतात तयार झालेल्या कफ सीरपमुळे यापूर्वीही परदेशात बेअब्रू झाली आहे. घातक कफ सीरपमुळे २०२२ साली ग्यांबियामध्ये अनेक मुलांचे मृत्यू झाल्यानंतर जागतिक आरोग्य संघटनेने भारतीय कफ सीरपसंदर्भात सावधतेचा इशारा दिला होता. उझबेकिस्तानमध्येही भारतीय कंपनीच्या कफ सिरपमुळे मुले दगावली होती. त्यानंतरही अनेक ठिकाणांहून अशाच स्वरूपाच्या काही तक्रारी आल्या होत्या. आता प्रश्न हा आहे की मागच्या चुकांपासून आपण कोणता बोध घेतला? त्यानंतर भारतीय औषध कंपन्यांची प्रतिष्ठा खराब झाली तरीही, देशात उत्पादित होणाऱ्या औषधांच्या गुणवत्तेशी तडजोड होऊ नये यासाठी कोणतीही कारवाई केली गेली नाही हे अत्यंत लज्जास्पद आहे. भारतातील औषध व्यापार साठ अब्ज डॉलर इतका आहे. याचा मोठा हिस्सा लहान कंपन्यांकडे आहे. चाचणीत लहान आणि मध्यम कंपन्यांची औषधे निर्धारित मानकांपेक्षा कमजोर असल्याचे या वर्षीच्या आपल्या अहवालात राष्ट्रीय औषध नियामक संस्थेने म्हटले आहे. या तपासणीत ६८ टक्के सूक्ष्म, लघु आणि मध्यम कंपन्या अनुत्तीर्ण झाल्या. यापूर्वी सन २०२३ मध्येही केंद्रीय यंत्रणांनी केलेल्या तपासणीत ६५ टक्के कंपन्यांची औषधे निकृष्ट दर्जाची असल्याचे आढळले होते. या वर्षी देशाची निर्यात ३० अब्ज डॉलरच्या पुढे जाईल, असा सरकारचा अंदाज आहे. हेच सन २०३० पर्यंत १३० अब्ज डॉलरच्या पुढे जाईल, अशी अपेक्षा आहे. मात्र याचबरोबर आव्हानेही वाढत आहेत. आरोग्यासारख्या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाची इभ्रत पणाला लावणे उपयोगी नाही. इथल्या औषधांच्या चाचण्या आणि निगराणी संशय घेण्याजोग्या आहेत हे मान्य करून त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या यंत्रणांना अधिक समन्वयाने आणि वेगाने काम करावे लागेल. कारण ही बाब केवळ आर्थिक उलाढाल आणि देशाच्या प्रतिमेशीच निगडित नाही तर अनेक रुग्णांच्या आयुष्याशीही जोडली गेलेली आहे.

# पाटबंधारे कार्यालयासमोर घाणीचे साम्राज्य

## ब्रम्हपुरीची 'स्वच्छ शहर-सुंदर शहर' ओळख नावालाच, परिसरात दुर्गंधी

ब्रम्हपुरी/का.प्र.

स्वच्छता सर्वेक्षण अंतर्गत ब्रह्मपुरी नगरपालिकेला पुरस्कार प्राप्त आहेत. म्हणूनच 'स्वच्छ शहर, सुंदर शहर' अशी ब्रह्मपुरी शहराची ओळख आहे. परंतु शहरातील नागरिकांच्या चुकीच्या वर्तनामुळे स्वच्छ शहर, सुंदर शहर अशी ब्रह्मपुरी शहराची ओळख धुळीस मिळणार आहे.



ब्रह्मपुरी शहरातील जिल्हा परिषदच्या लघु पाटबंधारे उपविभागाच्या कार्यालया समोर नागरिकांनी कचरा टाकून घाणीचे साम्राज्य निर्माण केले आहे. सदर कार्यालयासमोर घाणीचे साम्राज्य निर्माण झाल्यामुळे कार्यालयीन परिसरात दुर्गंधी पसरली आहे. खेडेगावातील अनेक नागरिक आपल्या शासकीय कामासाठी ब्रह्मपुरीला येतात. शासकीय कार्यालयासमोर नागरिकांची नेहमी वर्दळ असते. तसेच तिथे नागरिकांच्या सोयीसाठी चहापाण्याच्या टपऱ्या सुद्धा आहेत. तिथे जुने झुणका भाकर केंद्र सुद्धा आहे. घाणीच साम्राज्य पसरलेल्या ठिकाणी लगतच सार्वजनिक बांधकाम विभागाची भिंत आहे. त्याच परिसरातील शासकीय कार्यालया समोर नागरिकांनी कचरा टाकून घाणीचे साम्राज्य निर्माण केले. इतकेच नव्हे तर नागरिक लघुशंकेसाठी याच खुल्या असलेल्या जागेत जातात. त्यामुळे शासकीय कार्यालयाच्या परिसरात सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

नागरिकांच्या अशा गैरवर्तणुकीमुळे ब्रह्मपुरी शहराची ओळख धुळीस मिळत आहे. त्यामुळे ब्रह्मपुरी नगरपालिकेने स्वच्छता मोहीम राबवून सदर घाणीचे साम्राज्याची समस्या निकाली काढावी अशी मागणी सुज्ञ नागरिकांनी केली आहे.

### स्वच्छता पंधरवाड्याचा केवळ दिखावा

जिल्हा प्रशासनामार्फत महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर या कालावधीमध्ये स्वच्छता पंधरवडा राबविण्यात आला. या कालावधीमध्ये जिल्ह्यातील सर्व ठिकाणांवर स्वच्छता मोहीम राबवून परिसर स्वच्छ ठेवण्याचा उद्देश होता. मात्र ब्रह्मपुरी शहरातील ऐन लघू पाटबंधारे उपविभागीय कार्यालयासमोर घाणीचे साम्राज्य निर्माण झालेले असताना प्रशासनाकडून राबविण्यात येणाऱ्या स्वच्छता अभियानावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. जर लघू पाटबंधारे कार्यालयासमोरील घाणीचे साम्राज्य दुर केले नाही; तर कोणती स्वच्छता मोहीम राबविली यावर नागरिकांतून प्रश्नचिन्ह निर्माण केल्या जात आहे.

# रणमोचन येथे भव्य विदर्भस्तरीय खंजेरी भजन स्पर्धा

## १० व ११ ऑक्टोबरला राष्ट्रसंतांच्या पुण्यतिथी महोत्सवाचे आयोजन

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मलीन वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून दि. ११ ऑक्टोंबर २०२५ रोजी शनिवारला श्री गुरुदेव सेवा मंडळ रनमोचन (नवीन आबादी) यांच्या सौजन्याने रात्रो ८ वाजता विदर्भ स्तरीय भव्य खुली खंजेरी भजन स्पर्धेचे आयोजन श्री. गुरुदेव सेवा मंडळ रणमोचन येथे करण्यात आले आहे. या खंजिरी भजन स्पर्धेसाठी पहिले बक्षीस (पुरुष गट) ११,००१ रूपये, दुसरे बक्षीस ९,००१, तिसरे बक्षीस ७००१, चवथे बक्षीस ५००१, पाचवे बक्षीस ठेवण्यात आले आहे.तर महिला गटासाठी पहिले बक्षीस ७,००१रूपये, दुसरे बक्षीस ५,००१, तिसरे बक्षीस ३,००१, चौथे २००१, पाचवे बक्षीस १००१ रूपये अशी पुरस्काराची राशी आहे.

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून विजयभाऊ वडेट्टीवार विरोधी पक्षनेते तथा आमदार ब्रम्हपुरी विधानसभा श्रेत्र, सहउद्घाटक आमदार रामदास मसराम आरमोरी, अध्यक्ष म्हणून खासदार डॉ.नामदेवराव किरसान, उपाध्यक्ष प्रमोदभाऊ चिमुरकर माजी जि.प. सदस्य चंद्रपूर, जितू नखाते व अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी जास्तीत जास्त भजन मंडळांनी या स्पर्धेत सहभाग घेऊन कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन श्री.गुरुदेव सेवा मंडळ रनमोचन (नवीन आबादी) यांनी केले आहे.

### विनोदिनी

स्किन स्पेशलिस्ट का मित्र बहुत वर्षों बाद उससे मिलने उसके क्लिनिक आया... उसके क्लिनिक का ताम-झाम देख वह देखता ही रह गया... बाद में उसने डॉक्टर दोस्त से पुछा... कि तुम तो सर्जन बनना चाहते थे... ये स्किन स्पेशलिस्ट क्यों बने ?

डॉक्टर : क्या बताऊं यार... मैंने स्किन स्पेशालिस्ट बनकर बहोत अच्छा किया... अपना वो राम सर्जन बन गया... वो बड़ी दुविधा में हैं... कभी भी पेशंट की कॉल आने पर हॉस्पिटल जाना पड़ता हैं... मेरे पेशंट देख... एक तो स्किन के मरीज़ रात को डिस्टर्ब नहीं करते, दूसरा ये मरीज़ मरते नहीं और तीसरा ये कभी ठीक नहीं होते... याने अपना धंदा हमेशा सुरू...!

# एल.एम.बी. पब्लिक स्कुलमध्ये वादविवाद स्पर्धा उत्साहात संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

दि. २२ सप्टेंबर २०२५ला शनिवारी एल. एम. बी. पब्लिक स्कुलमध्ये इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांकरीता इतिहास विषयामध्ये वादविवाद स्पर्धेचे आयोजन केले.

कार्यक्रमामध्ये सर्वप्रथम वादविवाद स्पर्धा कशा प्रकारे होतात? त्याचे नियम आणि कशाप्रकारे अशा स्पर्धांना तोंड दयावे याचे मार्गदर्शन करण्यात आले. अशा स्पर्धेमध्ये किमान दोन बाजू असतात. यातील एक बाजू घेत दिलेल्या वेळेत तुमचे म्हणणे ठामपणे मांडायचे असते.







इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांनी एका आकर्षक सामाजिक अभ्यास वाद-विवाद स्पर्धेत त्याचे वक्तृत्व कौशल्य दाखवले. इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. वाकुळकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केलेला हा कार्यक्रम विद्यार्थ्यांमध्ये टीकात्मक विचार आणि नागरी जागरूकता वाढवण्याच्या शाळेच्या वचनबद्धतेचा पुरावा होता. या स्पर्धेत परिक्षक म्हणून स्कुलच्या संचालिका आशिता भैया मॅडम, प्राचार्य कादिर कुरेशी सर उपस्थित होते. स्पर्धेमध्ये सोहम टेंभरे, प्रवीर लांजेवार, आभास रामटेके, छकुली दखने, दिक्षीत मेश्राम, संस्कृती शेंडे, कुणाल राऊत, निस्वार्थ सहारे आणि श्रीहान पडिगेला हे नऊ प्रतिभावान वाद-विवादक होते. त्यांनी उल्लेखनीय अंतदृष्टीने तीन समकालीन विषयावर चर्चा केली.

या वादविवाद स्पर्धेच्या विषयांमध्ये सोशल मिडिया लोकांना एकत्र आणतो की समाजाला वेगळे करतो. सहभागींनी चुकीची माहिती आणि प्रतिध्वनी कक्षाद्वारे विभाजनाला चालना देण्याच्या त्यांच्या भूमिकेविरूद्ध एक सारख्या प्लॅटफार्मच्या एकत्रित शक्तिवर उत्साहाने चर्चा केली. २०२५ ऑनलाईन गेमिंग विधेयक सादर करून सरकारने कौतुकास्पद काम केले आहे का, अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या संदर्भात त्यांनी आपल्या सीमा ओलांडल्या आहेत. विद्यार्थ्यांनी अलीकडील कायद्यावर जोरदार टीका केली. सर्जनशील आणि स्वातंत्र्यावर अंकुश ठेवण्याच्या चिंतेविरूद्ध तरूणांचा गेमिंग व्यसनापासून वाचवण्याच्या हेतूचे वनज ठेवले. 'लहान व्यवसायावर ई-कॉमर्सचा ताबा' भारतीय अर्थव्यवस्थेसाठी हाच मार्ग आहे का? या चर्चेत अमेझॉनसारख्या ई-कॉमर्स दिग्गज कंपन्यांच्या उदयाचा शोध घेण्यात आला. ज्यामध्ये आर्थिक वाढ विरूद्ध पारंपारिक लघु व्यवसायांचे अस्तित्व यावर युक्तिवाद करण्यात आला.

शाळेच्या संचालिका अशिता मॅडम, प्राचार्य कादिर कुरेशी सर यांनी सहभागी विद्यार्थ्यांचं भरभरून कौतुक केले. स्पर्धेचे सुत्रधार डॉ. वाकुळकर सर यांनी विद्यार्थ्यांच्या जटिल सामाजिक, आर्थिक समस्यांशी संवाद साधण्याच्या क्षमतेबद्दल अभिमान व्यक्त केला. कार्यक्रमाला उपस्थितींनी अद्भूत म्हणून वर्णन केलेल्या या स्पर्धेने एल. एम. बी. पब्लिक स्कुलच्या समग्र शिक्षण सर्मपणाला अधोरेखित केले. विद्यार्थ्यांच्या सर्वागीण विकासाकरिता एल. एम. बी. स्कुल नेहमीच अशा स्पर्धांचे आयोजन करीत असते.

## अतिक्रमणधारक व जबरानजोत धारकांना तात्काळ जागेचे पट्टे द्या



ब्रम्हपुरी/का.प्र.

राज्य सरकारने संपुर्ण महाराष्ट्रातील सन २०११ पुर्वीच्या अतिक्रमण व जबरानजोत धारक शेतकरी तसेच प्लॉटधारकांना त्या जागेचे पट्टे वितरित करण्याचा निर्णय घेतला व त्यानुसार प्रत्येक तालुक्यात महसुल मंत्र्यांच्या आदेशानुसार पात्र लाभार्थ्यांचे सर्व्हे सुरु झाले. मात्र त्यामध्ये फक्त रेव्हेन्यु व गायरान जागेवरीलच पात्र लाभार्थ्यांना पट्टे देण्याचा सरकारने व प्रशासनाने निर्णय घेतलेला आहे. पण वनविभागाच्या जागेत मागील तीस ते चाळीस वर्षांपासून वास्तव्य करीत असलेले कुटुंब तथा शेती कसत असणारे शेतकरी यांना आदिवासी सोडुन इतर कुठल्याही घटकाला पट्टे वाटपाची प्रक्रिया शासनाकडून राबविली गेली नाही. अशा अनेक वर्षांपासून वास्तव्य व शेती करीत असणाऱ्या लाभार्थ्यांना सुध्दा शासन आणि संबंधित वनविभाग यांनी संगनमताने सरसकट लाभार्थ्यांना पट्टे देण्याचा निर्णय घ्यावा. वाढीव कुटुंब संख्या व मानवी कल्याणाचा विचार करुन या प्रक्रियेला सुरुवात करावी या मागणीचे निवेदन वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तहसीलदार यांचे मार्फत शासन व प्रशासनाला देण्यात आले.

मागणी पुर्ण न झाल्यास तिव्र आंदोलनाचा इशारा सुध्दा यावेळी देण्यात आला. हे निवेदन तालुकाध्यक्ष लिलाधर वंजारी यांच्या नेतृत्वात देण्यात आले. यावेळी जिल्हा सल्लागार डॉ. प्रेमलाल मेश्राम, जिल्हा उपाध्यक्ष डी.एम. रामटेके, तालुका महासचिव नरेंद्र मेश्राम, युवाध्यक्ष रतन लांडगे, उपाध्यक्ष कमलेश मेश्राम, उपाध्यक्ष अनिल कांबळे, सचिव अनंता मेश्राम व अनेक लाभार्थी उपस्थित होते.




दिनांक २ ऑक्टोबर २०२५ रोजी हितकारणी उच्च माध्यमिक विद्यालयात गांधी जयंती व लाल बहादूर शास्त्री जयंती साजरी करण्यात आली. त्यासाठी विद्यालयातील मुख्याध्यापक, उप मुख्याध्यापक, पर्यवेक्षक व सर्व शिक्षक सहकारी उपस्थित होते. हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पाडण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन बालपांडे मॅडम व आभार प्रदर्शन दोनाडकर सर यांनी सर यांनी केले.

## तोरगांवात गोपालकाला व सांस्कृतिक जल्लोष

## माजी खासदार अशोक नेते यांचे हस्ते उद्घाटन

ब्रम्हपुरी/का.प्र.

नवयुवक शारदा उत्सव मंडळ, तोरगांव खुर्द यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही गोपाळकाला



सोहळा व भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन उत्साहात करण्यात आले. गावातल्या या सोहळ्याचे उद्घाटन माजी खासदार तथा भाजपा अनुसूचित जनजाती मोर्चाचे राष्ट्रीय महामंत्री डॉ. अशोकजी नेते यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना मा.खा. डॉ. नेते म्हणाले, 'माझ्या दहा वर्षांच्या खासदारकीच्या काळात अनेक महत्त्वाची विकासकामं घडवून आणली .आपल्याच क्षेत्रात कॅम्पा-टेम्पा-चिमूर-वरोरा हा ब्रॉडगेज रेल्वेमार्ग मंजूर करून घेण्याचा मान माझ्या कार्यकाळात मिळाला. तोरगांव या गावाबद्दल माझ्या मनात विशेष प्रेम असून, येथे शिवजयंती, गोपाळकाला अशा अनेक प्रसंगी मी हजेरी लावली आहे. लोकसभेच्या निवडणुकीत तोरगांवने दाखवलेल्या विश्वासाबद्दल मी आपले मन:पूर्वक आभार मानतो. गावाच्या विकासासाठी आपण केलेल्या मागण्यांसाठी मी कटिबद्ध राहून प्रयत्न करणार आहे,' असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष तथा भाजप नेते कृष्णा भाऊ सहारे, मोहनजी दोनाळकर, पं.स. माजी सभापती रवि मेश्राम, माजी सदस्य दिवाकर कुंभारे, बुथ अध्यक्ष विलास सहारे, बुथ प्रमुख देविदास बावणे, पो.पा. जयाबाई मिसार, अरुण दोनाडकर यांसह गावातील नागरिक, बंधुभगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी नवयुवक मंडळाने मा.खा.डॉ. अशोकजी नेते यांचा शाल श्रीफळ देऊन मानसन्मान करत सत्कार केला. या सांस्कृतिक कार्यक्रमात गावातील विविध कलावंतांनी सादर केलेल्या कलाविष्कारांनी उपस्थितांचे मन भारावून टाकले.

# १० ऑक्टोबरच्या नागपूर महामोर्चासाठी गांगलवाडी-आवळगांव-मुडझा सज्ज

## ओबीसींच्या हक्कासाठी समाजाचा जयघोष



ब्रम्हपुरी/का.प्र.

ओबीसी समाजाच्या अस्तित्व आणि अधिकारावर गदा आणणाऱ्या ०२ सप्टेंबरच्या काळ्या जीआरविरोधात येत्या १० ऑक्टोबरला नागपूर येथे होणाऱ्या ओबीसी महामोर्चासाठी गांगलवाडी-आवळगाव-मूडझा जिल्हा परिषद सर्कलमधील ओबीसी बांधवांनी एकजुटीचा निर्धार केला आहे. या संदर्भातील नियोजन बैठक ०७ ऑक्टोबर ला ग्रामपंचायत भवन आवळगाव येथे ओबीसी नेते प्रभाकर सेलोकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

या बैठकीला कॉ. विनोद झोडगे, प्रमोद चिमुरकर आणि सुरेश बुरडे सर यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. या वेळी वक्त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, दोन सप्टेंबरचा काळा जीआर हा ओबीसी समाजाच्या अस्तित्वावर आघात करणारा असून, तो तातडीने रद्द केला पाहिजे. मराठा समाजाची ओबीसी आरक्षणात घुसखोरी थांबली पाहिजे आणि 'ज्यांची जितकी संख्या भारी, त्यांची तितकी भागीदारी' अशी तत्त्वाधिष्ठित न्यायव्यवस्था देशात प्रस्थापित झाली पाहिजे.' बैठकीदरम्यान ओबीसींची जातीनिहाय जनगणना, समाजातील प्रतिनिधित्वाचे योग्य विभाजन आणि शासकीय धोरणांतील अन्यायकारक हस्तक्षेप थांबविणे या मुद्द्यांवर सखोल चर्चा झाली. मार्गदर्शकांनी सांगितले की, 'आज आपण एकत्र आलो नाही, तर उद्या आपली पुढील पिढी अस्तित्वाच्या संकटात येईल. म्हणून आजच ओबीसी समाजाने आपल्या हक्कासाठी एकवटले पाहिजे आणि नागपूरच्या महामोर्चातून आपल्या ताकदीचा आवाज दाखविला पाहिजे.

या प्रसंगी उपस्थित सर्व मान्यवरांनी 'जय ओबीसी – जय संविधान! ओबीसी एकता – जिंदाबाद!' अशा घोषणांनी सभागृह दणाणून सोडले. जवळपास २० गावांतील प्रतिनिधी उपस्थित होते आणि प्रत्येकाने एकमुखाने ठरविले की, मी येणारच व माझ्यासोबत दहा जणांना घेऊन येणार. ही बैठक केवळ नियोजनाची नव्हती, तर ती ओबीसी एकतेच्या नव्या पर्वाची सुरुवात होती. नागपूरच्या महामोर्चातून ओबीसी समाज आपला इतिहास नव्याने लिहिणार आहे. अन्यायाच्या काळ्या छायेतून मुक्तता आणि सामाजिक न्यायासाठीचा हा मोर्चा महाराष्ट्राच्या जनमानसाला जागविणारा ठरणार आहे.

# बाबासाहेबांच्या स्वप्नपूर्तीसाठी जागोजागी धम्मदिक्षा सोहळा घ्या

## भदंत हर्षबोधी महास्थवीर : ६९ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळा

ब्रह्मपुरी/

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक बुध्द आहेत. त्यांनी आपल्याला स्वाभीमानाचे,



मानवतेचे जीवन दिले. मानवतावादी, परिवर्तनवादी बुध्द आहे. हा देश बाबासाहेबांच्या संविधानाने चालतो. आपण सकारात्मक विचार केला पाहिजे. जोपर्यंत बाबासाहेबांच्या धम्मदीक्षांचे सोहळे आपण घेणार नाही, तोपर्यंत आपली भागीदारी वाढणार नाही, म्हणून बाबासाहेबांच्या स्वप्नपूर्तीसाठी जागोजागी धम्मदीक्षा सोहळा घेणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन बुद्धगया ( बिहार) चे भदंत हर्षबोधी महास्थवीर यांनी केले.

ते ब्रह्मपुरी येथील पंचशील एज्युकेशन सोसायटीच्या प्रांगणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीतर्फे आयोजित ६९ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळयात अध्यक्षपदावरून बोलत होते. धम्ममंचावर प्रमुख वक्ते म्हणून नाशिकचे बौध्द साहित्यिक आचार्य नंदकिशोर साळवे, विशेष अतिथी श्रीलंकेचे भदंत धम्मप्रिय, दिल्लीचे भदंत डॉ.दीपंकर सुमेदो उपस्थित होते. याशिवाय समितीचे अध्यक्ष अशोक रामटेके, उपाध्यक्ष सुधिर अलोने, सचिव डॉ युवराज मेश्राम, संघटक नेताजी मेश्राम यांचीही उपस्थिती होती. याप्रसंगी पाहुण्यांच्या हस्ते दहावी व बारावीमधील गुणवंतांचा गौरव करण्यात आला.

यावेळी डॉ भदंत दीपंकर सुमेदो म्हणाले की, बाबासाहेबाने धम्मदीक्षा देऊन आपल्याला पूर्वीच्या धम्मात नेले. बाबासाहेबाचा रस्ता बुध्द धम्मापासून सुरु होतो. एका आंबेडकरीचा अर्थ होतो शिक्षित, समजदार व्यक्ती जो ज्ञान पसरवितो, असे मत व्यक्त केले तर आचार्य नंदकिशोर साळवेंनी, धम्मचक्र प्रवर्तन दिन हा दिवस आपल्या समाजाच्या प्रगतीचे हमीपत्र आहे. आपण धम्माबाबतीत उदासीन का आहोत? बाबासाहेबांच्या विचाराचे पालन करा व चळवळ पुढे न्या ! असे आवाहन केले.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमेला माल्यार्पण करुन त्रिशरणाने झाली. प्रास्ताविकेतून समितीध्यक्ष अशोक रामटेकेंनी समितीचे कार्य व आपली भूमिका स्पष्ट केली. संचालन समिती सचिव डॉ युवराज मेश्राम तर आभार प्रदर्शन आसाराम बोदेले यांनी केले. यशस्वीतेसाठी समिती पदाधिकारी सुधाकर पोपटे, के.जी, खोब्रागडे, राजू मेश्राम, दिनेश लोखंडे, जगदिश मेश्राम, इंजि.विजय मेश्राम, डॉ चंद्रशेखर बांबोळे, डॉ ई.एल.रामटेके, नरेंद्र बांते, अंकुश वाघमारे, महेंद्र कसारे, भीमानंद मेश्राम इत्यादींनी मोलाचे सहकार्य केले.

ब्रम्हपुरी समाचार अंक नियमित वाचनाकरीता
www.bramhapurisamachar.com/bs
या वेबसाईटवर लॉगीन करा...

# म.गांधी व लालबहादुर शास्त्री ही देशाची ओळख - प्राचार्य डॉ. शेकोकर



ब्रह्मपुरी/का.प्र.

"राष्ट्रपिता महात्मा गांधींनी सत्य, अहिंसा, न्यायाची नेहमी कास धरुन देशहिताचे कार्य केले. स्वातंत्र्यासाठी महात्मा गांधीनी प्राणाची बाजी लावली. सत्याग्रहाचे शस्त्र उपसले. लालबहादूर शास्त्रीनी 'जय जवान जय किसान'चा नारा देऊन शेतकऱ्यांच्या हितासाठी कार्य केले. 'मूर्ती लहान पण कीर्ती महान ' अशी त्यांचे कार्य होते. हे दोन्ही नेते आपल्या भारताची ओळख आहेत." असे मार्मिक भाष्य प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकरांनी केले. ते नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात म.गांधी व लालबहादूर शास्त्री जयंतीनिमित्त बोलत होते.

सर्वप्रथम दोन्ही थोर पुरूषांच्या प्रतिमांना प्राचार्य डॉ. शेकोकर व प्रा विनोद नरड यांनी माल्यार्पन करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली. यानंतर उपस्थित डॉ. रेखा मेश्राम, डॉ. धनराज खानोरकर, डॉ. असलम शेख, डॉ. मोहन कापगते, डॉ. किशोर नाकतोडे, डॉ. रतन मेश्राम, डॉ. योगेश ठावरी, डॉ. युवराज मेश्राम, डॉ. कुलजित शर्मा, डॉ. प्रकाश वट्टी, डॉ. भास्कर लेनगुरे, डॉ. पद्माकर वानखडे, डॉ. विवेक नागभीडकर, डॉ. मिलिंद पठाडे, डॉ. अरविंद मुंगोले, डॉ. अजित खाजगीवाले, डॉ. दर्शना उराडे, डॉ. अतुल येरपुडे, प्रा. जयेश हजारे, प्रा. धिरज आतला, डॉ. मोहुर्ले, प्रा. ठोंबरे, पर्यवेक्षक प्रा. आनंद भोयर, अधीक्षक संगीता ठाकरे, रोशन डांगे, सुषमा राऊत, घनश्याम नागपूरे, दत्तू भागडकर, जयंत महाजन इत्यादींनी प्रतिमेला पुष्प वाहून अभिवादन केले.

कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन डॉ. युवराज मेश्राम यांनी केले. यशस्वीतेसाठी समिती प्रभारी डॉ. कुलजित शर्मा, डॉ. खानोरकर, डॉ. मेश्राम, प्रा. आतला, जगदिश गुरनुले, प्रदीप रामटेकेंनी सहकार्य केले.

जल है तो कल है... झाडे लावा, झाडे जगवा

# स्मिता व राजेश पारधी यांचा काँग्रेसला रामराम

## आम. बंटी भांगडिया यांच्या उपस्थितीत भाजप प्रवेश



ब्रम्हपुरी/का.प्र.

दि.०७ ऑक्टोबरला काँग्रेसच्या माजी जि.प. सदस्या स्मिता पारधी व माजी सरपंच राजेश पारधी यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

चिमुर विधानसभा क्षेत्राचे लोकप्रिय आमदार किर्तीकुमार उर्फ बंटीभाऊ भांगडीया हे ब्रम्हपुरी येथे दौऱ्यावर असताना ब्रम्हपुरी तालुक्यातील माजी जिल्हा परिषद सदस्या कॉग्रेस पक्षाच्या प्रमुख पदाधिकारी स्मिता पारधी व राजेश पारधी यांच्या सह त्यांच्या समर्थकांनी राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, रविंद्रजी चव्हाण भाजपा प्रदेशाध्यक्ष यांच्या मार्गदर्शनात कार्य करणारे कार्यसम्राट आमदार बंटीभाऊ भांगडीया यांच्या कार्यशैलीने प्रभावीत होऊन शासकीय विश्रामगृह ब्रम्हपुरी येथे भारतीय जनता पार्टीत रितसर प्रवेश घेतला.

यावेळी कृष्णा सहारे, दिपक उराडे, विलास विखार, सुधीर दोनाडकर, विलास उरकुडे, रवि मेश्राम, सुरेश दर्वे, गणेश तर्वेकर, अवेश पठाण व संजय गजपुरे, भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# ढाणकी प्रकरणातील नराधम शिक्षकास फाशीची शिक्षा द्या

## पद्मशाली समाजाचे तहसिलदार मार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी पद्मशाली समाज ब्रम्हपुरी तर्फे येथील समाजबांधवांनी ढाणकी (यवतमाळ) येथील पद्मशाली समाजाच्या अल्पवयीन मुलीवर शिक्षकाने अमानुषपणे लैंगिक अत्याचार केला, आणि त्यात ती अल्पवयीन मुलीचा मृत्यू झाला. त्या नराधम शिक्षकास कठोरात कठोर शिक्षा होवून फाशी द्यावी. या मागणीकरीता ब्रम्हपुरी तहसीलदार मार्फतीने मा. मुख्यमंत्री आणि चंद्रपूर जिल्हाधिकारी यांना घडलेल्या घटनेची समाजबांधवांनी तीव्र शब्दात निषेध करून निवेदन देण्यात आले.




ब्रम्हपुरी तहसील कार्यालयात जावून तहसीलदार सतीश मासाळ यांच्या माध्यमातून निवेदन देण्यात आले. यावेळी पद्मशाली फाउंडेशनचे संचालक रवि चामलवार, पद्मशाली फाउंडेशनचे संचालक संतोष सिलवेरी, मुकेश बोधनवार मंडळ अधिकारी, सुधाकर पेदुलवार, किशोर उताणे, विशाल इजमुळवार, अजय बिद्दूरवार, विनोद पेदुलवार इ. समाज बांधव उपस्थित होते.

# डॉ. पंजाबराव देशमुख पतसंस्थेकडून अनेकांना मदत

## संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत प्रा. प्रकाश बगमारे यांचे प्रतिपादन

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी परिसरातील छोटे व्यवसायिक व दुकानदार यांना बचतीची सवय लागावी आणि त्याद्वारे त्यांच्या व्यवसायामध्ये भरभराट व्हावी आणि नवोदितांनी शिक्षणाबरोबरच व्यवसायाची कास धरावी यासाठी जनजागरण करून आर्थिक सहाय्य करण्याच्या दृष्टीने २००२ मध्ये प्रा. प्रकाश बगमारे व सहकारी यांच्या अथक प्रयत्नाने ब्रह्मपुरी येथे डॉ पंजाबराव देशमुख नागरी सहकारी पतसंस्थेची स्थापना करण्यात आली.

अतिशय अल्प भाग भांडवलावर सुरू झालेली ही संस्था गेली वीस वर्ष ब्रह्मपुरी तालुक्यातील अनेक व्यावसायिक यांना आर्थिक सहकार्य करून त्यांच्या प्रगतीमध्ये हातभार लावलेला आहे. अनेकांना नवीन व्यवसाय सुरू करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन करण्यासाठी डॉ पंजाबराव देशमुख माहिती व मार्गदर्शन केंद्र याद्वारे प्रशिक्षण देण्याचं कार्य सुद्धा संस्थेद्वारे वेळोवेळी करण्यात आले व आर्थिक सहकार्य करणे यामुळेच या संस्थेचा व्याप दिवसेंदिवस वाढत आहे. या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रकाश बगमारे यांचे नेतृत्वाखाली कार्यरत या संस्थेत अनेक मान्यवर कार्यरत आहे. विद्यमान कार्यकारी मंडळ मनिषा बगमारे यांच्या अध्यक्षतेखाली कुशलपणे कार्य करीत आहे. परिसरातील नागरिकांनी या संस्थेमध्ये आपली डिपॉझिट ठेवून समाजातील वंचिताच्या सेवे हातभार लावावा म्हणून संस्था प्रयत्नशील आहे. या संस्थेद्वारे अनेकांना प्रगतीचा मार्ग सापडलेला आहे.

संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २८ /९ /२०२५ रविवारला डॉ. पंजाबराव देशमुख कॉन्व्हेंट ब्रम्हपुरी येथे पदाधिकारी व सभासद यांच्या उपस्थितीत पार पडली. सभेत व्यवस्थापक जयघोष सहारे यांनी जमाखर्च, ताळेबंद पत्रक यांचे वाचन केले आणि उपस्थितांचे आभार मानले. या कार्यात मिलिंद राऊत, राजू चौधरी, पंकज चट्टे, शारदा देशमुख यांनी विशेष परिश्रम घेतले.

**... QUOTES ...**

**"Work is accomplished by those employees who have not yet reached their level of incompetence."**


**- Laurence I. Peter**

**चारोळी**

तु खोटं खोटच सांगितलस
तुझं माझ्यावर प्रेम असल्याचं...
ती मी इतका मोहरून गेलो,
खरंच नाही वाटत प्रेम नसल्याचं...

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★

# ख्रिस्तानंद विद्यालयात गांधी व शास्त्री जयंती साजरी




ब्रम्हपुरी/का.प्र.

स्थानिक खिस्तानंद स्कुल अँड ज्युनिअर कॉलेज ब्रह्मपुरी येथे महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर पावना, उपमुख्याध्यापिका सिस्टर अंजली प्रामुख्याने उपस्थित होत्या. अतिथींच्या हस्ते महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना पुष्पगुच्छ अर्पण करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी 'रघुपति राघव राजाराम' हे प्रार्थना गीत सादर केले. तसेच विद्यालयातील वर्ग सहावीची विद्यार्थिनी स्वरा नंदरधने हिने 'दसरा' या सणाविषयी माहिती सांगितली. कार्यक्रमाला विद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी व शिक्षक वर्ग उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

**पाणी अडवा, पाणी जिरवा...**

# भजन संध्या कार्यक्रमातून हनुमान वारकरी महिला भजन मंडळाची समाज जागृती

ब्रम्हपुरी/का.प्र.

मागील दहा वर्षापासून ब्रह्मपुरी तालुक्यातील वांद्रा गावातील हनुमान वारकरी महिला भजन मंडळाच्या माध्यमातून समाज प्रबोधनावर आधारित भजन संध्या कार्यक्रम सुरू आहे. त्यात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, अंधश्रद्धेवर आधारित वेगवेगळे भजन, विविध देवी देवतेवर आधारित भजन, भागवत सप्ताहाच्या महोत्सवात, गणेशोत्सव, नवरात्री उत्सव अशा वेगवेगळ्या पारंपारिक महोत्सवात भजनाच्या माध्यमातून भजन संध्या उपक्रम राबविला जात आहे. त्यामुळे समाजात जनजागृती होत आहे. एवढेच नव्हे तर हनुमान वारकरी महिला भजन मंडळाने वेगवेगळ्या गावातील आजपर्यंत भजन स्पर्धेत सहभाग घेतला असून भजने सादर केले आहेत. मंडळाच्या अध्यक्ष आशा विजय ठाकरे यांच्या नेतृत्वात भजन मंडळ कार्य करीत आहे.

❀❀❀❀❀❀

# एलएमबी स्कुलमध्ये म. गांधी व शास्त्री जयंती

ब्रम्हपुरी/का.प्र.

शातंता व अहिसेंचा संपूर्ण जगाला संदेश देणारे राष्ट्रपिता महात्मा गांधी व 'जय जवान जय किसान' असा नारा देणारे देशाचे द्वितीय पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांची जयंती २ ऑक्टोंबरला एल. एम. बी पब्लिक स्कुल, ब्रम्हपुरी येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. अहिसांचा संदेश देणारे महात्मा गांधी तर 'मुर्ती लहान पण किर्ती महान' म्हणून ओळखले जाणारे लालबहादुर शास्त्री हे दोन्ही भारतीय इतिहासातील दिग्गज नेते होते.












दि. १ ऑक्टोंबर रोजी गांधी आणि शास्त्री जयंतीचे आयोजन शाळेच्या विद्यार्थ्यांनी केले. शाळेच्या बाल गोपालांनी गांधीजी व शास्त्रीजी यांची वेशभूषा घेऊन गांधीजींचे विचार विद्यार्थ्यांपुढे मांडले. ओम प्रधान इ.४ थी च्या विद्यार्थ्यांने 'बुरा मत सोचो, बुरा मत बोलो, बुरा मत देखो' असा संदेश सांगितला. अद्वीक लांजेवार KG-II, मल्हार ठाकरे KG-I B, निमिश थाटकर KG-1A, यांनी गांधीची वेशभूषा धारण केली. कियांश पारथी नर्सरी यांनी लाल बहादुर शास्त्री यांची वेशभूषा केली. कार्यक्रमाचे संचालन व आभार आदित्य मेंढे इ. ९ वी च्या विद्यार्थ्यांनी केले.

दुसऱ्या दिवशी दि. २ ऑक्टोंबर रोजी शाळेचे शिक्षक व शिक्षिकांनी गांधी जयंती चा कार्यक्रम मोठ्या थाटात साजरा केला. कार्यक्रम प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया सर यांच्यासह स्कुलच्या संचालिका आशिता भैया मॅडम, प्राचार्य कादिर कुरेशी सर, उपप्राचार्य रश्मी राठी मॅडम, पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम, शिक्षक व शिक्षकेत्तर वर्ग उपस्थित होते. कार्यक्रमाप्रसंगी भजनाचा कार्यकम आयोजित करण्यात आला. भजनाची सुरूवात गांधीचे आवडते भजन 'वैष्णव जन तो...' हे भजन शाळेच्या विद्यार्थ्यांनी सुंदर स्वरात सादर केले. त्यानंतर वर्ग २ री च्या कृष्णाई मस्के या विद्यार्थीनीने 'टाळ बोले चिपळीला' हे भजन गायले. आणि शाळेच्या शिक्षिकांनी तर एक आगळी वेगळी भजनाची श्रृंखला गायली. जी शाळेचे संगित शिक्षक हेमंत खोब्रागडे सर यांनी तयार केली. सुंदर अशा स्वरात भजनाने शाळेचे वातावरण प्रसन्न झाले.

शाळेच्या शिक्षकांनी केलेल्या सादरीकरणाचे संचालन व आभार प्रदर्शन अनुराधा चंद्रगिरीवार मॅडम यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमाप्रसंगी शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. प्रसंगी भैया सरांनी दसऱ्याच्या शुभेच्छा दिल्या. महान संत व महान व्यक्तिमत्व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि कमयोगी मदनगोपालजी भैया यांना वंदन म्हणून राष्ट्रवंदना घेवून कार्यक्रमाचा शेवट झाला.

Miracle constructions & Developers

श्रीराम नगरी - डेव्हलपर्स

NATP प्लॉट्स उपलब्ध

- सिंदेवाही
- नवरगांव
- तळोधी
- चंद्रपुर (चौराळा)

संपर्क : अनिल दोनाडकर

मो. 8806776699, 9834946501

डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

प्रो.प्रा. सुरेश सोरते

मो. 8698323337

सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स

गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर नागभीड रोड, ब्रम्हपुरी

रेलींग, ग्रिल व गेट स्टिलचे नावे बनवून मिळेल.




## ब्रम्हपुरी नगराध्यक्ष...

(पान क्र. ९ वरून)

क्रमांक ०३ - ना.म.प्र., सर्वसाधारण (महिला), प्रभाग क्रमांक ०४- अनु. जाती (सर्वसाधारण),सर्वसाधारण (महिला), प्रभाग क्रमांक ०५- अनु. जाती (सर्वसाधारण), सर्वसाधारण (महिला), प्रभाग क्रमांक ०६- अनु. जाती (महिला), सर्वसाधारण , प्रभाग क्रमांक ०७- अनु. जाती (महिला), सर्वसाधारण , प्रभाग क्रमांक ०८- अनु. जाती (महिला), सर्वसाधारण , प्रभाग क्रमांक ०९- ना.मा.प्र., सर्वसाधारण (महिला), प्रभाग क्रमांक १०- ना.मा.प्र., सर्वसाधारण (महिला), प्रभाग क्रमांक ११- ना.मा.प्र. (महिला), ना.मा.प्र. (महिला), सर्वसाधारण

ब्रम्हपुरी नगर पालिका नगरसेवक पदाचे आरक्षण सोडत पिठासन अधिकारी पर्वनी पाटील यांच्या उपस्थितीत ब्रम्हपुरी नगर परिषदेच्या सभागृहात पार पडली. यावेळी ब्रम्हपुरी नगर पालिकेच्या प्र. मुख्याधिकारी सोनम देशमुख यांच्यासह ईश्वर बिचेवार, मंगेश बोंद्रे, शरद नन्नावरे, अविनाश बंडावार यांच्यासह राजकीय पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व पत्रकार बहुसंख्येने उपस्थित होते.

# संघ शताब्दी वर्षात संघकार्य अधिक गतीने करा - चिंतनभाई उपाध्याय

### ब्रम्हपुरीत विजयादशमी उत्सव



ब्रम्हपुरी/का.प्र.

संघ स्वयंसेवकांनी आज देशातील विपरीत परिस्थितीवर मात करून संघाचे कार्य अधिक गतीने करायचे असून, संघ स्थापनेपासून हेच सुरू आहे. संघाच्या दैनिक शाखेतून घडत गेलेल्या संस्कारामुळेच आजवरची संघाची यशस्वी वाटचाल आहे. संघशताब्दी वर्षातही संघ स्वयंसेवकांनी विचलीत न होता ठरवून दिलेले कार्यक्रम अधिकाधिक चांगले केले पाहिजे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम क्षेत्र सह प्रचारक चिंतनभाई उपाध्याय यांनी केले. ब्रम्हपुरी संघ शाखेच्या तरुण स्वयंसेवकांच्या विजयादशमी उत्सवप्रसंगी ते संबोधित करत होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी प्रा. संतोष मेश्राम, विभाग संघचालक जपत खरवडे, नगर कार्यवाह स्वप्निल माकोडे उपस्थित होते.

प्रारंभी स्वागत प्रणाम, शस्त्र पूजन, ध्वजारोहण, प्रार्थना झाल्यावर नगर कार्यवाहन यानी प्रास्ताविक केले. अमृतवचन नितीन आंभोरकर, सुभाषित भगवान बोरकर, तर वैयक्तिक गीत दीनानाथ येलतुरे यांनी सादर केले. ध्वजावतरणाने उत्सवाची सांगता झाली. मुसळधार पावसामुळे स्थळ बदलावे लागले असले तरी कार्यक्रम ठरल्याप्रमाणे उत्साहात संपन्न झाला.

## ने.हि. महाविद्यालयाची...

(पान क्र. ९ वरून)

मेरिट), भाग्यश्री भाकरे ( एम एस स्सी फिजिक्स ४थे मेरिट), सुहासिनी डोर्लीकर ( एम एस स्सी केमेस्ट्री २रे मेरिट), निकेश ठाकरे (एम एस स्सी केमेस्ट्री ३रे मेरिट), स्नेहल तुपट ( बी लीप ३रे मेरिट), अंकिता मदनकर ( एम.लिप प्रथम मेरिट), निकिता पिलारे (एम.लिप २रे मेरिट) या २६ विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या इतिहासात मानाचा तुरा रोवला असून संस्थेचे सचिव अशोक भैयांची दूरदृष्टी, अद्यावत शिक्षणव्यवस्था व महाविद्यालयातील नियमित वर्ग, तज्ज्ञ प्राध्यापक यामुळे हे घवघवीत यश प्राप्त झाल्याचे अनेक विद्यार्थ्यांनी बोलून दाखविले.

गुणवत्ता यादीत आलेल्या संपूर्ण विद्यार्थ्यांचा संस्थेच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला असून नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती स्नेहलताताई भैया, उपाध्यक्ष ॲड. प्रकाश भैया, सचिव अशोक भैया, सदस्य गौरव भैया, प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकर, समस्त प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन करून भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.


Lubi PUMPS-MOTORS

बुधवार बंद

- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.

सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता

गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी

रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी

फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053

Kirloskar CRI

ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान

1994 पासून आपल्या सेवेत

किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404